# चौफुला

## काव्य जुने, शब्द नवे

"वाक्यं रसात्मकं काव्यं" या व्याख्येनुसार भावनांचे रसपूर्ण
अलगूज म्हणजे काव्य. या साहित्य प्रकारातली विविधता अतिशय
सौंदर्यपूर्ण आहे. असे वैविध्य रसिक श्रोत्यांसमोर पुन्हा नव्याने
उलगडून दाखवायच्या उद्देशाने शिकागो येथील बृहन महाराष्ट्र
मंडळाच्या १५व्या अधिवेशनात मराठी काव्य संमेलन करायचे
योजिले आहे. आपल्या संपन्न मराठीतील आभिव्यक्तीच्या काळानुसार
बदललेल्या नवनविन काव्याविष्कारांबरोबरच काळाच्या पडद्याआड
होत चाललेल्या पारंपारीक काव्य वैभवालाही उजाळा देण्याचा हेतू
आहे. या काव्यसंमेलनाचे हेच वैशिष्ठ्य असेल.

यासाठी अमेरिका / कॅनडा येथील मराठी कवी / कवयित्रींकडून
काव्य मागविण्यात येत आहे. निवड समितीने सर्व प्रवेशिकांमधून
निवडलेले काव्य अभिवाचन अथवा गायन स्वरुपात सादर
करण्यासाठी त्याच्या कवी / कवयित्रींना स्वखर्चाने कन्व्हेन्शनला
उपस्थित राहणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी
http://www.bmm2011chicago.org या साइटला भेट द्या आणि
लवकरात लवकर नोंदणी करा. आता काव्य म्हणजे काय
हे आपल्यासारखे संवेदनशील वाचक तसेच लेखक जाणताच.
मग घ्या हाती लेखणी. आपले सृजनत्व काव्य प्रतिभेतून फुलू
द्या. लिहीते व्हा आणि लवकरात लवकर आपले काव्य
आमच्याकडे chaufula@gmail.com या पत्त्यावर
पाठवून द्या.

प्रवेशिका पाठवण्याची अंतिम तारीख - १५ मे २०११.







